# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.05.2026** **वारःबुधवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्रपती यांच्यात आज चर्चा, अनेक महत्वाच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी होणार
2. केंद्रीय मंत्रिमंडळाचे अनेक महत्वाचे निर्णय, उसाला प्रति क्विंटल 365 रुपये एफआरपी देण्यास मंजुरी
3. विधानसभा निवडणुक निकालानंतर सत्ता स्थापनेला वेग
4. मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यायला ममता बॅनर्जी यांचा नकार, बॅनर्जी यांचे आरोप, निवडणूक आयोगानं फेटाळले आणि
5. चीनमध्ये फटाक्यांच्या कारखान्याला लागलेल्या आगीत 26 जणांचा मृत्यू, 61 जखमी

**<u>पंतप्रधान-व्हिएतनाम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत व्हिएतनामचे राष्ट्रपती तो लाम यांच्याशी द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर सखोल चर्चा करतील. व्हिएतनामचे राष्ट्रपती काल भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर नवी दिल्लीत दाखल झाले. त्यांच्यासोबत व्हिएतनाम सरकारचे अनेक मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेले एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ आणि व्यापारी शिष्टमंडळही आहे. या वर्षी एप्रिलमध्ये व्हिएतनामचे राष्ट्रपती म्हणून निवड झाल्यानंतर, तो लाम यांचा हा भारताचा पहिलाच राजकीय दौरा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्रपती यांच्यातील चर्चेनंतर, अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या जातील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात तो लाम यांची भेट घेतील. इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्सद्वारे आयोजित 56 वे  सप्रू हाऊस व्याख्यान देखील तो लाम देतील. पंतप्रधान मोदी यांच्या 2016 मधील व्हिएतनाम दौऱ्यादरम्यान सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी स्तरावर संबंध दृढ करण्यास सहमती देण्यात आली होती, या घटनेच्या दहाव्या वर्धापनदिनी तो लाम भारतभेटीवर आले आहेत, ही विशेष बाब आहे. दोन्ही नेत्यांमधील या संवादामुळे आधीच मजबूत असलेल्या द्विपक्षीय संबंधांना नवी गती मिळेल, तसंच भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील सहकार्यासाठी नवीन मार्ग खुले होतील, अशी अपेक्षा आहे.

**<u>ब्रिक्स</u>**

भारताच्या अध्यक्षतेखालील 'ब्रिक्स' 'च्या रोजगार कार्यगटाची' दुसरी बैठक आज केरळममधील तिरुवनंतपुरम इथं सुरू होणार आहे. या दोन दिवसीय बैठकीत रोजगार आणि कामगार कल्याण, सामाजिक सुरक्षा प्रणाली भक्कम करणे, कार्यालयात महिलांचा सहभाग वाढवणे आणि इतर अनेक विषयांवर ब्रिक्स

सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधी विचारमंथन करतील. कामगारांपर्यंत विशेषतः गिग वर्कर्स पर्यंत लाभ पोहोचवण्यात डिजिटल तंत्रज्ञानाच्या भूमिकेवरही या बैठकीत चर्चा होणार आहे. ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, सौदी अरेबिया, इजिप्त, इथिओपिया, इराण, इंडोनेशिया आणि संयुक्त अरब अमिराती यांचा ब्रिक्स सदस्य राष्ट्रांमध्ये समावेश आहे.

**<u>एफआरपी-केंद्रीय मंत्रीमंडळ</u>**

ऊसाचा एफआरपी 10 रुपयांनी वाढवून प्रति क्विंटल 365 रुपये करण्यास केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मंजुरी दिली. यामुळं देशभरातल्या शेतकऱ्यांना 1 लाख कोटी रुपयांचा लाभ होईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं.

कापसाची उत्पादकता वाढवण्यासाठी कपास क्रांती या नव्या अभियानालाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे. कापसाची प्रति हेक्टर उत्पादकता दुप्पट करण्याचं याचं उद्दिष्ट आहे. आगामी 5 वर्षांसाठी हे अभियान राबवलं जाणार आहे. याअंतर्गत देशभरात जिनिंग आणि प्रेसिंगची 2 हजार केंद्र सुरू केलं जाणार आहेत. यात संशोधन, उत्पादकता वाढवणे आणि त्यानंतरची प्रक्रीया यांना प्राधान्य दिलं जाणार आहे.

तसंच रबी हंगामात 8 लाख 19 हजार 882 मेट्रीक टन हरभऱ्याची खरेदी करायलाही सरकारनं मंजुरी दिली आहे. या खरेदीसाठी महिनाभराची मुदतवाढ देण्यात आली असून आता 29 मेपर्यंत राज्यात हरभरा खरेदी सुरु राहील, असंही वैष्णव यांनी सांगितलं.

केंद्रीय मंत्रीमंडळानं एमएसएमई, बिगर एमएसएमई आणि विमान कंपन्यांसाठी  विनातारण कर्ज योजनेलाही मान्यता दिली. तसंच गुजरातमध्ये आणखी 2 सेमीकंडक्टर प्रकल्प सुरू करायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. सर्वोच्च न्यायालयातल्या न्यायाधीशांची संख्या 33 वरुन 37 करायलाही केंद्र सरकारनं काल मंजुरी दिली.

**<u>सरकार स्थापना</u>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवल्यानंतर नवीन सरकारच्या स्थापनेच्या तयारीला वेग आला आहे. पश्चिम बंगाल विधिमंडळ पक्षाच्या नेत्याच्या निवड प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी भाजपाने पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे, तर ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी हे सहनिरीक्षक असतील. आसाम विधिमंडळ पक्षाच्या नेत्याच्या निवड प्रक्रियेसाठी केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी सह निरीक्षक असतील.

तामिळनाडूमध्ये, विधानसभा निवडणुकांमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आलेल्या टी. व्ही. के. पक्षाचे नेते जोसेफ विजय हे आज राज्यपालांची भेट घेऊन राज्यात नवीन सरकार स्थापन करण्यासाठी प्रस्ताव सादर करतील अशी माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.

केरळमध्ये सत्ता स्थापनेच्या संदर्भात युडीएफमध्ये अनौपचारिक बैठका सुरू आहेत.

पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकीतल्या विजयानंतर भाजपाच्या आमदारांच्या बैठकीत काल आमदार ए. नमस्सीवयम यांची भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व्ही. पी. रामलिंगम आणि केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय या बैठकीला उपस्थित होते.

**<u>ट्रंप-मोदी-अभिनंदन</u>**

भारतीय जनता पक्षानं, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक आणि निर्णायक विजय मिळवल्याबद्दल, अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>ममता-पूल-संध्या</u>**

दरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पदाचा राजीनामा द्यायला नकार दिला आहे, त्या काल कोलकाता इथं पत्रकार परिषदेत बोलत होत्या. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतला तृणमूल काँग्रेसचा पराभव हा जनादेश नसून भाजपनं निवडणुकीत गैरप्रकार केल्याचा आरोप बॅनर्जी यांनी केला. निवडणूक आयुक्तांनी जनतेचे लोकशाही हक्क पायदळी तुडवले असाही आरोप त्यांनी केला तृणमूल पक्षाचा पराभव लोकांनी केला नसून हा पराभव एका षडयंत्रामुळे झाला आहे, त्यामुळे राजीनामा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असं बॅनर्जी म्हणाल्या.

अशा प्रकारची विधानं करताना संयम बाळगण्याचं आवाहन भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी केलं आहे. ही विधानं चिंताजनक आहेत, देशात सत्तेचं हस्तांतरण हे नेहमीच शांततामय मार्गानं होत आलं आहे असं पात्रा यांनी स्पष्ट केलं असून हा केवळ भाजपवर झालेला हल्ला नाही, तर लोकशाहीवर आणि संविधानावर हा हल्ला झाला आहे असं पात्रा यांनी म्हटलं आहे.

भवानीपूर विधानसभा मतदारसंघातील मतमोजणीबाबत ममता बॅनर्जी यांनी केलेले आरोप, निवडणूक आयोगानं निराधार आणि खोटे असल्याचं सांगत फेटाळून लावले आहेत. मतमोजणी सुरू असताना सीसीटीव्ही कॅमेरे बंद करण्यात आले होते, हा आरोपही स्पष्टपणे नाकारण्यात आला आहे.

**<u>गडकरी-ऑटो समिट</u>**

इलेक्ट्रिक वाहने खरेदी करण्याबाबत लोकांमध्ये वाढता उत्साह दिसून येत आहे असं केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित एका खाजगी 'ऑटो समिट आणि पुरस्कार 2026' कार्यक्रमात गडकरी काल बोलत होते. जीवाश्म इंधनाला सर्वोत्तम पर्याय ठरू शकणाऱ्या घटकांचा वापर करण्यासाठी आणि लोकांमध्ये त्यांचा प्रसार करण्यासाठी व्यापक संशोधन केलं जात आहे अशी माहिती गडकरी यांनी दिली.

शेतकऱ्यांची भूमिका आता केवळ अन्न उत्पादक आणि शेती करणारे इतकीच मर्यादित राहिलेली नाही; तर आता ते ऊर्जा-निर्माते, डांबर उत्पादक आणि हायड्रोजन-निर्माते झाले आहेत असंही गडकरी यांनी सांगितलं.

**<u>चीन फटाका स्फोट</u>**

चीनमधील हुनान प्रांतात एका फटाका कारखान्यात भीषण स्फोट झाला असून 26 जणांचा मृत्यू झाला आहे, तर 61 जण जखमी झाले आहेत. शिन्हुआ वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, हा स्फोट शुक्रवारी संध्याकाळी गुंडू टाउनशिपमधील एका कंपनीत झाला. स्फोटानंतर तात्काळ बचावकार्य सुरू करण्यात आलं आणि जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या दुर्घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून पुढील तपास सुरू आहे.

**मुष्टियुद्ध**

उझबेकिस्तानमधील ताश्कंद इथं सुरू असलेल्या 15 आणि 17 वर्षाखालील आशियाई मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धा 2026' मध्ये, भारताचे युवा खेळाडू चमकदार कामगिरी करत आहेत. काल या दोन्ही गटांमध्ये भारताच्या खेळाडूंनी अनेक विजय नोंदवले.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल चेन्नई सुपर किंग्सनं दिल्ली कॅपिटल्सचा आठ गडी राखून पराभव केला. नाबाद 87 धावांची खेळी करून संजू सॅमसन 'सामनावीर ठरला. पुढचा सामना आज संध्याकाळी सनरायझर्स हैदराबाद आणि पंजाब किंग्स यांच्यात हैदराबाद इथं होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं बिहार आणि पश्चिम बंगालमधील काही भागात वीजांसह वादळी वारे वाहण्याची शक्यता वर्तवली असून नारिंगी बावटा जारी केला आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, आसाम, सिक्कीम, तामिळनाडू, पुदुच्चेरी, कराईकल, केरळ आणि माहे या भागांतही आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, कोकण आणि गोव्यामध्ये हवामान उष्ण आणि दमट राहील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार